दिनांक १३/०२/२०२३

## प्रेस नोट

**आरोपी लोकसेवीका कल्याणी जितेंद्र सोनवणे, वय ४९ वर्षे, पद– वरिष्ठ लिपीक, नेमणुक– पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड, जि. नांदेड, संलग्न नेमणुक पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर, रा. बोधे नगर, लातूर, जि. लातुर यांचेवर लाचेची मागणी केल्याने गुन्हा.**

यातील आरोपी लोकसेवीका कल्याणी जितेंद्र सोनवणे, वरिष्ठ लिपीक यांनी पत्नीचे मेडीकल बिलाची मागील वर्षाची फाईल मंजूरीकरीता पुढे पाठविल्याचा मोबदला म्हणुन २०००/–रू व जानेवारी महीन्यात मंजूरीसाठी दाखल केलेल्या इतर तीन फाईल विना त्रुटी जिल्हा शल्य चिकीत्सक, सामान्य रूग्णालय, लातूर येथे पाठविण्यासाठी आणि बिल मंजूरीकरीता मदत करण्यासाठी २२,०००/–रू असे एकुण २४,०००/–रू लाचेची मागणी केली असले बाबतची तक्रार दि १०/०२/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दि. १०/०२/२०२३ रोजी व दि १३/०२/२०२३ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, तक्रारदार यांचे पत्नीचे मेडीकल बिलाची मागील वर्षाची फाईल मंजूरीकरीता पुढे पाठविल्याचा मोबदला म्हणुन २०००/– रू व जानेवारी महिन्यात मंजूरीसाठी दाखल केलेल्या इतर तीन फाईल विना त्रुटी जिल्हा शल्य चिकीत्सक, सामान्य रूग्णालय, लातूर येथे पाठविण्यासाठी आणि बिल मंजूरीकरीता मदत करण्यासाठी २२,०००/– रू असे एकुण २४,०००/– रूपयाची लाचेची मागणी केल्याचे लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले. लागलीच पंचासह लाचेची मागणी केलेली रक्कम देण्यासाठी तक्रारदार आरोपी लोकसेविका यांचे कडे गेले असता, आलोसे महीला लिपीक सोनवणे यांना तक्रारदार यांचा संशय आल्याने त्यांनी जाणीवपुर्वक लाचेची रक्कम स्विकारण्यास टाळाटाळ केली. आज दि १३/०२/२०२३ रोजी पुनःश्च पंचासमक्ष लाचेची मागणी केलेली रक्कम देण्यासाठी तक्रारदार गेले असता आरोपी लोकसेविका लिपीक सोनवणे यांनी पुनःश्च लाच मागणी करून, संशय आल्याने लाच स्विकारण्यास जाणीवपुर्वक टाळाटाळ केली.

तक्रारदार यांना आरोपी लोकसेवीका कल्याणी जितेंद्र सोनवणे, वरिष्ठ लिपीक यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम २४,०००/–रू. देण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथील लेखाशाखा विभाग येथे गेले असता आलोसे यांना संशय आल्याने आरोपी लोकसेवीका यांनी सदर लाचेची रक्कम घेण्याचे जाणुनबुजुन टाळले.

तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक कल्याणी सोनवणे, वरिष्ठ लिपीक यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन शिवाजी नगर, लातूर, जि. लातूर. येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन महीला लिपीक कल्याणी सोनवणे यांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्री. धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानुसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोह/रमाकांत चाटे, फारूक दामटे, भागवत कठारे, भिमराव आलुरे, पोना/संतोष गिरी, पोकॉ/शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, दिपक कलवले, संदीप जाधव, मंगेश कोंडरे, गजानन जाधव, मपोकॉ/रूपाली भोसले, चापोना/ संतोष खिरसागर यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १) डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९६२३९९९९४४ |
| २) श्री. धरमसिंग चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९९२३४९७०७६ |
| ३) श्री. पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ९३०९३४८९८४ |
| ४) टोल फ्री | :– | १०६४ |
| ५) हेल्पलाईन क्रमांक कार्यालयाचा फोन क्रमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ६) Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ७) Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| 8) Facebook Page | :– | www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर